# म. गांधी यांचे महिला सबलीकरणविषयक विचार

**प्रा. वंदना शामराव खोराटे,** डॉ. घाळी महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर,

...........................................................................................................

**प्रस्तावना :**

दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत महिला समाजाच्या आधारस्तंभ बनल्या आहेत. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्यपूर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अत्यंत कुशलतेने आणि कोमलतेने त्या निभावत आहेत.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचा सामाजिक दर्जा व स्थान उंचावण्यासाठी ज्या पुरोगामी विचारांच्या महान व्यक्तींनी महत्वाचे योगदान दिले त्यामध्ये महात्मा गांधीजींचा उल्लेख अग्रक्रमाने करणे क्रमप्राप्त ठरते. तत्कालिन पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने महिलांना अनेक बंधनांमध्ये बंदिस्त केले होते. महिलांना समाजव्यवस्थेने स्वतंत्र असे कोणतेही हक्क दिले नव्हते. तिचे विश्व हे घराच्या चार भिंतीतच बंदिस्त करण्यात आले होते. तत्कालिन समाजव्यवस्थेने महिलांना अनेक सामाजिक कुप्रथांमध्ये जखडून ठेवले होते. अशा परिस्थितीत पुरुषप्रधान बंधनांमुळे महिला न्यूनगंडाने ग्रस्त झाल्या होत्या. पर्यायाने याचा परिणाम राष्ट्र विकासावर होत होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत महात्मा गांधीजींनी महिलांच्या सबलीकरणाबाबत महत्वपूर्ण विचार मांडून त्यांना कृतीची जोड दिल्यामुळे महिलांच्या स्थितीत व दर्जात सुधारणा होण्यास भरीव मदत झाली.

महात्मा गांधी ही केवळ एक व्यक्ती नव्हती तर भारताच्या संकृतीशी, तत्वज्ञानाशी निगडीत असा एक विचार होता. हा विचार नव्या पिढीपर्यंत पोहचला पाहिजे, या भावनेतूनच हा शोधनिबंधाचा लेखनप्रपंच...!

**मातृत्वाबद्दलचे गांधीजींचे विचार :**

गांधीजी मातृत्वाचा गौरव करतात. त्यांच्या दृष्टीनंमातृत्व ही केवळ जीवशास्त्रीय घटना नाही; तर त्यात सांस्कृतिक आणि भावनिक आशयही आहे. गांधीजी पतिनिरपेक्ष, पुरुषनिरपेक्ष मातृत्वाची कल्पना करतात. जी आपल्या संस्कृतीत प्राचीन काळापासून आहे. जगत्जननी, कालीमाता, दुर्गामाता, भूमाता, भारतमाता असे शब्द या कल्पनेतून भाषेत आले आहेत.

मातृत्वात सामावलेला सारा भावनिक आणि सांस्कृतिक आशय लक्षात घेऊनच गांधीजी म्हणतात, 'मला मनूची आई व्हायचंय' मनू ही गांधीजींच्या दूरच्या पुतण्याची मुलगी. मनूच्या अपेंडिक्सच्या ऑपरेशनच्या वेळी गांधीजींनी आईच्या मायेनं तिची सर्व प्रकारची काळजी घेतली. ते मनूची आई झाले होते. मनूपण बापूंना आईच्या रुपातच बघायची.

**स्त्रिया आणि कुटुंबासंबंधीचे विचार :**

सत्य आणि अहिंसा या गांधीजींच्या दोन जीवननिष्ठा. त्यांच्या मते अन्याय, अत्याचार, शोषण ही हिंसेचीन रुपं आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात संघर्ष करणं, लढे उभारणं ही त्या जीवननिष्ठांची कार्याच्या रूपातली स्वाभाविक परिणती. हिंसेविरूद्धचा लढा अहिंसक पद्धतीनेच लढला जाणार, असं त्यांच स्पष्ट मत होतं. म्हणूनच त्यांनी अहिंसक सत्याग्रहाचं एक अभिनव तंत्र जगाला दिलं. कुटुंबव्यवस्था ही समताधिष्ठीत, शोषणविरहित आणि अहिंसेच्या मूल्यावर उभारलेली असणं गांधीजींना अभिप्रेत होतं.

कुटुंबातील पुरुषी वर्चस्व, समतेच्या विचारांना दिला जाणारा फाटा, स्त्रीवर होणारे अन्याय—अत्याचार, तिचं होणारं शोषण हे सर्व गांधीजींना खुपत होतं. म्हणूनच ते या रुढ प्रवाहापेक्षा वेगळी कुटुंबव्यवस्था निर्माण करू बघत होते. कुटुंबात पुरुष श्रेष्ठ आणि

स्त्री दुय्यम मानली जाते. पुरुषाची श्रेष्ठता त्याच्या गुणांवरुन ठरते, तर स्त्रीची तिच्या पतिनिष्ठेवरुन आणि मातृत्वावरुन ठरते. गांधीजी म्हणतात, स्त्री व पुरुष दोघांनाही सारख्याच क्षमता मिळालेल्या आहेत. बुद्धीच्या बाबतीत स्त्री–पुरुषापेक्षा कमी नाही. तिलाही स्वतंत्र व्यक्तित्व आहे. पुरुषाप्रमाणे तिलाही सर्व अधिकार मिळायला हवेत.

**महिलाश्रमाचं योगदान :**

गांधी, विनोबांचं मार्गदर्शन लाभलेली 'महिलाश्रम' ही वर्ध्यातली एक स्त्री–शिक्षण संस्था. तिथे विद्यार्थिनींचं पुरुषनिरपेक्ष, स्वतंत्र, निर्भय व्यक्तिमत्व घडत जायचं. तिथल्या सर्वच विद्यार्थिनी स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाल्या. त्या सगळया जणींनी आपापली घरं सांभाळून अर्थार्जनही केलं. महिलाश्रमामुळे आपलं पुरुषनिरपेक्ष स्वतंत्र व्यक्तिमत्व घडलं, तसं इतर स्त्रियांचं घाडावं; स्त्रीपुरुषसमतेचा विचार सार्वत्रिक व्हावा या उदात्त हेतूनं घर आणि नोकरी सांभाळून स्त्रियांच्या उद्‌बोधनाचं काम त्या सातत्यानं करत राहिल्या. भूदान आंदोलनातही यांनी हिरीरिने सहभाग घेतला. महिलाश्रमात झालेल्या गांधीविचारांच्या संस्कारांचा हा परिणाम आहे असे म्हणता येईल.

स्त्रीच्या क्षमतेच्या संबंधात गांधीजी म्हणतात की, अनेक पिढयांच्या संस्कारांमुळे स्त्रीमध्ये त्याग, सहिष्णुता, सेवापरायणता, नैतिकता या मानवीय गुणांचा उत्कर्ष झालेला दिसतो. गांधीजींच्या मते हे गुण अहिंसक समाजनिर्मितीसाठी खूप आवश्यक असल्याने पुरुषांनीही स्वत:मध्ये या गुणांचा विकास करावा.

गांधीजींच्या आश्रमातील स्त्रीपुरुषसमता, स्त्री–पुरुषांमधला मोकळेपणा याबद्‌दल सी.एफ.ॲ‍ड्रयूज म्हणतात, ''गांधीजी जो उपदेश करतात, त्यांच प्रत्यक्ष दर्शन त्यांच्या आश्रमात होतं. साबरमती आश्रमातील स्त्रियांना पुरुषांइतकेच अधिकार आहेत. तिथे बालविवाह किंवा पर्दाप्रथा नाही. प्रत्येक महत्वाच्या बाबीसंबंधी निर्णय घेताना आश्रमातील स्त्रियांनाही मत नोंदवण्याचा अधिकार आहे. आश्रमात मुलामुलींचं संगोपन एकत्रच आणि एकाच पद्धतीने होतं. आश्रमात स्त्री–पुरुषांच्या वागण्यात जो मोकळेपणा दिसतो, तसा कुठल्याही पूर्वेकडच्या देशात मला आढळत नाही.''

**रुढी–परंपरा आणि स्त्री–जीवन :**

सतीप्रथा, विधवा–विवाहाला बंदी, जरठकुमारी विवाह, बालविवाह, केशवपन करुन स्त्रीला विद्रूप करणं यसासारख्या दुष्ट रूढी–परंपरांनी पूर्वीच्या स्त्रीयांचं जगणं अवघड करून टाकलं होतं. या सर्व रूढी–परंपरेतून पुरुषश्रेष्ठताच अधोरेखित होते. विधवा विवाहाला बंदी, विधुर मात्र बायको मेल्यावर लगेच बोहल्यावर चढणार! आपली मुलगी शोभेल अशा मुलीशी विवाह करणार. विधवा अंधाच्या खोलीत ढकलली जाणार. या संदर्भात गांधींजी म्हणतात की, ''पत्नी देवाघरी गेल्यावर एखादा पुरुष लगेच बोहल्यावर चढतो, तेव्हा माझी मान शरमेनं खाली जाते.''

काही समाजसुधारकांनी या सर्व रूढी–परंपरांविरुद्ध आवाज उठवला. परिणामत: सती प्रथेविरुद्ध कायदा झाला. तरीही रुपकुंवर सती जाते. तिचं देऊळ उभारून समाज तिची पूजा बांधतो. असं सर्वच कायद्यांच्या बाबतीत घडत असतं. कारण कायदा हा समाजाच्या मानसिकतेच्या पायावर उभा असतो. त्यामुळे दुष्ट रूढी परंपरांच्या विरोधात समाजाचं उद्‌बोधन करून मानसिकता घडवणं खूप महत्वाचं आहे. गांधीजींनी तसा प्रयत्न सतत केला. केशवपन बंद झालं. बालविवाह क्वचितच दिसतात. इतर रूढी काही प्रमाणात शिथिल झाल्या. स्त्रीयांनी उपकृत भावनेनं हे बदल सहर्ष स्वीकारले तथापि स्वत: काहीही न करता इतरांनी केलेल्याचा स्वीकार करणे ही निष्क्रियता गांधीजींना मान्य नव्हती.

**अन्यायग्रस्तांनी कृतिप्रवण होणं गरजेचं :** ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांनी त्या विरोधात आवाज उठवला पाहिजे असं गांधीजींचं मत होतं. अन्यायग्रस्त व्यक्तीने कृतीशून्य राहणं गांधीजींना मान्य नव्हतं. 'जसे विचार तसे आचार' हे गांधीजींचं वैशिष्टय.

आफ्रिकेतील गोऱ्या सरकारनं एका कायद्याद्वारे केवळ ख्रिश्चन धर्माप्रमाणे केलेले विवाह वैध ठरविले. परिणामी इतर धर्माप्रमाणे झालेले विवाह अवैध ठरले. हा विवाहित स्त्रीयांचा अपमान होता, अन्याय होता. या अन्यायाच्या विरोधात स्त्रियांनी सत्याग्रह करावा अशी आग्रही भूमिका गांधीजींनी घेतली. त्यांनी प्रथम कस्तुरबांना सर्व स्थिती समजावून सांगितली आणि कस्तुरबांना सत्याग्रहासाठी राजी केलं. त्यांच्या मदतीने इतर स्त्रियांना या सत्याग्रहाची प्रेरणा दिली. अनेक स्त्रियांनी या सत्याग्रह—आंदोलनात सहभाग घेतला. या आंदोलनामुळे स्त्रियांच्या सूक्ष्म क्षमतांना प्रकटीकरणाची संधी मिळाली. संधी मिळाल्यास स्त्रीया खूप काही करू शकतात, हे या आंदोलनानं सिद्ध केलं. हीच गोष्ट आज एकविसाव्या शतकातही दिसते. संधी मिळालेली प्रत्येक स्त्री आपलय क्षमतेनुसार उच्चपदी विराजमान झालेली दिसते. या आंदोलनाचा परिणाम म्हणजे स्त्रीयांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. या सर्व स्त्रीया शस्त्रनिरपेक्ष वीरश्रीच्या तेजाने तळपत होत्या. या आंदोलनाच्या नेतृत्वाबद्दल गांधीजी म्हणतात, ''तळपत्या सौदामिनींच्या एखाद्या पथकाचं नेतृत्व आपण करतोय.''

**मिठाचा सत्याग्रह आणि स्त्रीयांचा सहभाग :**

सर्व स्तरांतील स्त्रियांचा लक्षणिय सहभाग हा मिठाच्या सत्याग्रहावेळी देखिल दिसून आला. कारावासाचं भय त्यांनी सोडलं. लाठया—काठया झेलल्या. हातही उगारला नाही. आणि मागे ही हटल्या नाहीत. आफ्रिकेतील स्त्रियांप्रमाणेच त्यांच्यातही शस्त्रनिरपेक्ष वीरश्रीचं तेज प्रकट झालं! कुटुंबात बंदिस्त असलेली स्त्री मोकळी झाली. घराबाहेर पडली. तिच्यावर होणारे अन्याय, अत्याचार आणि शोषण थोडं कमी झालं.

जागतिक इतिहास पाहिल्यास असे लक्षात येते की, इतर कोणत्याही देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनापेक्षा भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी स्त्रियांची संख्या खूपच मोठी होती. याचे कारण म्हणजे गांधीजींचे अहिंसक आंदोलन हे स्त्रियांसाठी अनुकूल होतं आणि स्त्रियांच्या सहभागासाठी गांधीजींनी केलेले प्रयत्न. गांधीजी स्त्रीला अहिंसेची मूर्ती मानतात. स्त्रीमधील त्याग, सहिष्णुता हे गुण अहिंसक आंदोलनासाठी खूप महत्वाचे वाटतात. सत्याग्रह आंदोलनातील सहभागानंतर स्त्रिया पुरुषांच्या बरोबर खांद्याला खांदा लावून काम करू लागल्या.

**गांधीजींचा 'ब्रम्हचर्य' विचार :**

गांधीयुगात स्त्री ही पुरुषाबरोबर निर्भयतेनं काम करताना दिसते. या निर्भयतेत ब्रम्हचर्याच्या विचाराचा वाटा खूप मोठा आहे. गांधीजींच्या एकादश व्रतांमधलं हे व्रत आहे. ब्रम्हचर्याचा संबंध केवळ मुमुक्षूंशी होता. पण गांधीजींनी संसारी माणसासाठी ब्रम्हचर्य—व्रतपालन आवश्यक मानलं. गांधीजींनी या व्रताला व्यापक पातळीवर नेलं. अविवाहित राहणं, स्त्रीसंग टाळणं, एवढाच ब्रम्हचर्याचा अर्थ नाही. ब्रम्हचर्य म्हणजे लैंगिक भावनेवर संयमानं नियंत्रण ठेवणं. स्त्री—पुरुषांनी लिंगभावाशिवाय परस्परांकडे पाहणं. मैत्रीच्या भावनेने पाहणं, विषयवासनेच्या आहारी न जाणं या सगळया व्यापक आशयामुळेच स्त्रिया निर्भयतेनं पुरुषांबरोबर काम करू शकल्या.

गांधीजींनीही वयाच्या ३५ व्या वर्षी ब्रम्हचर्यव्रत घेतलं आणि आयुष्यभर त्याचं पालन केलं. गांधीजींच्या या ब्रम्हचर्यव्रताचं फलित म्हणजेच सरोजिनी नायडू, डॉ. सुशिला नायर, प्रेमाबेन कंटक इ. स्त्रीया तयार झाल्या. ब्रम्हचर्य पालनाचा अधिकार गांधीजींमुळेच स्त्रीयांना मिळाला.

सत्याग्रहात सहभागी झाल्याने देशाच्या स्वतंत्र्यासाठी आपणही योगदान देऊ शकतो, असा विश्वास स्त्रीमध्ये निर्माण झाला. तिचा न्यूनगंड दूर झाला. व्यक्तिमत्व विकसित झालं. तिला आपल्या क्षमतांचं भान आलं. गांधीजींनाही स्त्रीच्या क्षमतांची जाणीव झाली होती. म्हणूनच मिठाच्या सत्याग्रहावेळी आपल्यानंतर नेतृत्वाची जबाबदारी सरोजिनी नायडूंवर सोपवली.

स्वत:च्या विकारांवर नियंत्रण मिळवू इच्छिणारा आणि ते साध्य करणारा हा महात्मा लैंगिकतेवर मात करण्याच्या प्रयत्नाला सर्वाधिक प्राधान्य देतो; कारण त्यावर मात करता आली की, इतर विकारांवर नियंत्रण ठेवणं तुलनेने सोपं आहे असं त्यांना वाटत होतं. गांधीजींच्या ब्रम्हचर्य व्रतामुळेच रात्रं—दिवसाची तमा न बाळगता त्यांचे अनुयायी स्वातंत्र्य आंदोलनात आपल्या कुटुंबासह सहभागी झाले होते.

गांधी विचारातून मिळालेला परस्परांकडे पाहण्याचा हा निकोप दृष्टिकोण सर्व स्त्री—पुरुषांसाठी आजही मार्गदर्शक ठरेल.

**'बा' आणि बापूंचे संबंध :**

गांधीजींचे कस्तुरबांशी अत्यंत प्रेमाचे संबंध होते. अपवाद म्हणजे गांधीजी आफ्रिकेत असताना कस्तुरबांना घराबाहेर काढायला निघाले होते. त्याप्रसंगात गांधीजी सर्वसामान्य भारतीय नवऱ्याच्या भूमिकेत होते. महात्मापदी पोहचण्याची प्रारंभिक पावलं पडायला सुरुवातही झाली नव्हती. पण; हा घराबाहेर काढण्याचा प्रसंग गांधीजींनी प्रांजळपणे 'सत्याचे प्रयोग' या आपल्या आत्मकथनात नोंदवला म्हणून आपल्याला ज्ञान झाला. पण त्यानंतर मात्र पत्नीची काळजी घेणाऱ्या प्रेमळ पतीपर्यंत गांधीजींचं झालेलं परिवर्तन नोंद घेण्यासारखंच आहे. 'बां'च्या प्रत्येक आजारपणात बापूंनी त्यांची मनापासून सेवा केली. कुटुंबात समतेचं तत्व दाखल करणाऱ्या गांधीजींनी कुटुंबातील आपलं आचरणही समताधिष्ठितच ठेवलं.

**निष्कर्ष :**

१. स्त्रीकडे बघण्याचा कुटुंबाचा आणि समाजाचा दृष्टिकोण मानवतावादी बनला.
२. कुटुंबसंस्थेत समता आणि लोकशाही मूल्यांचे संस्करण झाले.
३. महिलांना स्वत:च्या क्षमतांची जाणीव झाली आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला.
४. स्त्री—पुरुष समानता प्रस्थापित झाली.

**समारोप :**

स्त्री—पुरुषाच्या एकत्र येण्यातून कुटुंब बनतं. तथापि, कुटुंबाचं बंधन असूनही पुरुषाला जितकी मोकळीक आणि विकासाची संधी मिळते. तितकी ती स्त्रील मिळत नाही. गांधीजींनी स्त्रियांना ही संधी उपलब्ध करून दिली. गांधीविचार हा निरंतर सत्याचा शोध आहे. तो सतत उत्क्रांत होत गेलेला विचार आहे. गांधीजींची भाषा पारंपारिक वाटली तरी त्यातला संदेश अतिशय क्रांतिकारक आहे.

**संदर्भ :**

१. सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा — मो.क. गांधी, नवीन आवृत्ती, मार्च २०१०.
२. गांधी उद्यासाठी — संपादक, दिलीप कुलकर्णी, आवृत्ती पहिली, जाने. २०१९.